बाब क्र. १(ब)

# मुंबई विद्यापीठ

दिनांक १९ जून, २०२३ रोजी
सकाळी ११.०० वाजता झालेल्या
विशेष अधिसभेचे इतिवृत्त

**Minutes of the Special Senate Meeting held on 19 June, 2023 At 11.00 A.M.**

क्र.का.प्रा.वि/आयसीडी/२०२२-२३/१०६

# मुंबई विद्यापीठ

**अधिसभा इतिवृत्त**

दिनांक १९ जून २०२३

अधिसभा विशेष सभा शुक्रवार दिनांक १९ जून २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता कावसजी जहांगीर दिक्षांत सभागृह येथे आयोजित केली होती. सदर बैठकीत खालील मान्यवर उपस्थित होते.

| अनु. क्र. | सदस्यांचे नाव | उपस्थिती |
|---|---|---|
| १ | प्रा. रविंद्र कुलकर्णी (कुलगुरू) | उपस्थित |
| २ | प्रा. अनिल सिंग | उपस्थित |
| ३ | प्रा. शिवराम एस. गर्जे | उपस्थित |
| ४ | प्रा. कविता लघाटे | उपस्थित |
| ५ | प्रा. अनिल कुमार सिंग | उपस्थित |
| ६ | डॉ. प्रसाद महादेव कारंडे | उपस्थित |
| ७ | प्रा.(सी.ए.) प्रदीप कामथेकर | उपस्थित |
| ८ | प्रा. डॉ. किशोर सुखतनकर | उपस्थित |
| ९ | डॉ. अद्वैत एम वैद्य | उपस्थित |
| १० | श्री. श्रीपाद एस वेलिंग | उपस्थित |
| ११ | प्रा. कविता लघाटे | उपस्थित |
| १२ | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय | अनुपस्थित |
| १३ | संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय | अनुपस्थित |
| १४ | डॉ. नंदकिशोर रा. मोतेवार | उपस्थित |
| १५ | डॉ. सुनिल पाटील | उपस्थित |
| १६ | डॉ. मोहन नामदेव आमृळे | उपस्थित |
| १७ | श्री किरण रघुनाथ लेले | उपस्थित |
| १८ | ॲड. आशिष चव्हाण | उपस्थित |
| १९ | श्री. संतोष परब | उपस्थित |
| २० | श्रीमती वर्षा परचुरे | उपस्थित |
| २१ | श्री. चैतन्य गिरी | उपस्थित |
| २२ | श्री. सुशिलकुमार एस जाजू | उपस्थित |
| २३ | श्री. भूषण मर्दे | उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| २४ | श्री. मयुरेश पंढरीनाथ नेतकर | उपस्थित |
| २५ | श्रीमती रुची माने | उपस्थित |
| २६ | श्री. धनेश सावंत | उपस्थित |
| २७ | श्री. सुनिल राणे | अनुपस्थित |
| २८ | श्रीमती वर्षा गायकवाड | अनुपस्थित |
| २९ | श्री विलास पोतनीस | अनुपस्थित |
| ३० | प्रा. सुनिल भिरूड | उपस्थित |

सभेची सुरुवात वंदे मातरम या गीताने झाली, तसेच महाराष्ट्र राज्य गीत व मुंबई विद्यापीठ गीत देखील सभागृहात सादर करण्यात आले.

महाराष्ट्रातील शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि कला इत्यादी क्षेत्रातील अनेक नामवंत व्यक्तीचे निधन झाल्यामुळे समाजाचे व विद्यापीठाचे कधीही भरून न येणारे नुकसान झाले आहे. असे निवेदन प्रा सुनिल भिरूड, प्रभारी कुलसचिव यांनी केले व श्रद्धांजलीचा प्रस्ताव मांडला.

**<u>श्रद्धांजली</u>**

**लीलाताई शहा**

ज्येष्ठ लेखिका आणि जयसिंगपूर येथील मराठी जैन साहित्य संमेलनाच्या माजी अध्यक्षा लीलाताई शहा यांचे वृध्दापकाळाने दिनांक 20 मार्च, 2023 रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या 87 वर्षांच्या होत्या.

**स्वामिनी सावरकर**

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या स्नुषा स्वामिनी सावरकर यांचे अल्पशा आजाराने दिनांक 21 मार्च, 2023 रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या 83 वर्षांच्या होत्या.

**उषा गोकाणी**

गांधी स्मारक निधी, मुंबई या संस्थेच्या माजी अध्यक्ष व महात्मा गांधी यांची नात उषा गोकाणी यांचे अल्पशा आजाराने दिनांक 21 मार्च, 2023 रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या 89 वर्षांच्या होत्या.

**अभय छजलानी**

'द इंडियन न्यूज पेपर सोसायटी' चे माजी अध्यक्ष अभय छजलानी यांचे अल्पशा आजाराने दिनांक 23 मार्च, 2023 रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते 88 वर्षांचे होते.

**राहुल बनसोडे**

तरुण लेखक, पर्यावरण आणि पुरोगामी विचारसरणीचे कार्यकर्ते, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यावसायिक, नाटय निर्माते असे बहुआयामी व्यक्तिमत्व असलेले राहुल बनसोडे यांचे अल्पशा आजाराने दिनांक 24 मार्च, 2023 रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते 43 वर्षांचे होते.

**प्रदीप सरकार**

लेखक - दिग्दर्शक प्रदीप सरकार यांचे अल्पशा आजाराने दिनांक 24 मार्च, 2023 रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते 68 वर्षांचे होते.

**मनोज आचार्य**

प्रसिध्द लेखक आणि चित्रकार मनोज आचार्य यांचे अल्पशा आजाराने दिनांक 26 मार्च, 2023 रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते 61 वर्षांचे होते.

**गिरीष बापट**

पुण्याचे माजी पालकमंत्री आणि माजी भाजप खासदार गिरीष बापट यांचे प्रदीर्घ आजाराने दिनांक 29 मार्च, 2023 रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते 72 वर्षांचे होते.

**विवान सुंदरम**

चित्र - शिल्पांच्या पलीकडल्या दृष्यकलेत मांडण शिल्पे, व्हीडिओ कला आदी अनेक प्रयोग करणारे आणि सामाजिक भान जपणारे दृष्यकलावंत विवान सुंदरम यांचे अल्पशा आजाराने दिनांक 29 मार्च, 2023 रोजी निधन झाले. मृत्यूसमयीते 80 वर्षांचे होते.

**शरद काळे**

निवृत्त सनदी अधिकारी आणि मुंबई पालिकेचे माजी आयुक्त शरद काळे यांचे प्रदीर्घ आजाराने दिनांक 31 मार्च, 2023 रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते 83 वर्षांचे होते.

**सलीम दुराणी**

क्रिकेटपटू सलीम दुराणी यांचे अल्पशा आजाराने दिनांक 02 एप्रिल, 2023 रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते 88 वर्षांचे होते.

**अरविंद पंचाक्षरी**

ज्योतिषाचार्य अरविंद पंचाक्षरी यांचे वृध्दापकाळाने दिनांक 04 एप्रिल, 2023 रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते 84 वर्षांचे होते.

**अजित भगत**

प्रयोगशील नाटयलेखक- दिग्दर्शक अजित भगत यांचे हृदयविकाराने दिनांक 04 एप्रिल, 2023 रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते 69 वर्षांचे होते.

**डॉ. पौर्णिमा आडवाणी**

राष्ट्रीय महिला आयोगाच्या माजी अध्यक्ष, लेखिका आणि प्रख्यात वकील डॉ. पौर्णिमा आडवाणी यांचे अल्पशा आजाराने दिनांक 01 एप्रिल, 2023 रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या 63 वर्षांच्या होत्या.

**डॉ. मा. प. मंगुडकर**

ज्येष्ठ लेखक-विचारवंत आणि विधान परिषदेचे माजी आमदार डॉ. माणिक पद्मण्णा उर्फ मा. प. मंगुडकर यांचे वृध्दापकाळाने दिनांक 09 एप्रिल, 2023 रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते 94 वर्षांचे होते.

**उत्तरा बावकर**

प्रसिध्द अभिनेत्री उत्तरा बावकर यांचे दीर्घकालीन आजाराने दिनांक 12 एप्रिल, 2023 रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या 79 वर्षांच्या होत्या.

**कॅप्टन भाऊराव खडताळे**

कर्मवीर दादासाहेब गायकवाड सांस्कृतिक केंद्राचे संस्थापक आणि बौध्द समाजातील पहिले वैमानिक अशी ओळख असलेल्या कॅप्टन भाऊराव खडताळे यांचे वृध्दापकाळाने दिनांक 15 एप्रिल, 2023 रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते 90 वर्षांचे होते.

**दीपक भट्टाचार्य**

संस्कृत विषयातील तज्ज्ञ आणि वेदशास्त्राचे गाढे अभ्यासक दीपक भट्टाचार्य यांचे वृध्दापकाळाने दिनांक 21 एप्रिल, 2023 रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते 82 वर्षांचे होते.

**तारेक फतह**

पाकिस्तानी वंशाचे कॅनडाचे पत्रकार तारेक फतह यांचे दीर्घ आजाराने दिनांक 24 एप्रिल, 2023 रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते 73 वर्षांचे होते.

**प्रकाशसिंग बादल**

शिरोमणी अकाली दलाचे नेते आणि पंजाबचे माजी मुख्यमंत्री प्रकाषसिंग बादल यांचे श्वसनासंबंधी त्रासामुळे दिनांक 25 एप्रिल, 2023 रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते 95 वर्षांचे होते.

**रणजीत गुहा**

प्रसिध्द इतिहासकर रणजीत गुहा यांचे वृध्दापकाळाने दिनांक 28 एप्रिल, 2023 रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते 100 वर्षांचे होते.

**प्रशांत नाडकर**

वृत्तपत्र छायाचित्रकार प्रशांत नाडकर यांचे हृदयविकाराने दिनांक 05 मे, 2023 रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते 48 वर्षांचे होते.

**विश्वनाथ महाडेश्वर**

मुंबईचे माजी महापौर विश्वनाथ महाडेश्वर यांची प्रकृती खालावल्याने दिनांक 08 मे, 2023 रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते 63 वर्षांचे होते.

**डॉ. राम ताकवले**

देशातील आणि राज्यातील शिक्षण व्यवस्था सुधारण्यात, मुक्त शिक्षणाची संकल्पना रुजवण्यात समाजाच्या तळागाळापर्यंत षिक्षण पोहोचवण्यात योगदान देणारे ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ, माजी कुलगुरु डॉ. राम ताकवले यांचे वृध्दापकाळाने दिनांक 13 मे, 2023 रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते 90 वर्षांचे होते.

**डॉ. किशोर सानप**

ख्यातनाम समीक्षक व संत साहित्याचे अभ्यासक डॉ. किशोर सानप यांचे अल्पशा आजाराने दिनांक 20 मे, 2023 रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते 67 वर्षांचे होते.

**रवींद्र वैद्य**

ज्येष्ठ समाजवादी नेते, पत्रकार रवींद्र वैद्य यांचे वृध्दापकाळाने दिनांक 26 मे, 2023 रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते 90 वर्षांचे होते.

**जयंत सहस्त्रबुध्दे**

विज्ञान भारतीचे राष्ट्रीय संघटन सचिव आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक जयंत सहस्त्रबुध्दे यांचे अल्पशा आजाराने दिनांक 02 जून, 2023 रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते 57 वर्षांचे होते.

**सुलोचना लाटकर**

ज्येष्ठ अभिनेत्री, पद्मश्री व महाराष्ट्र भूषण सुलोचना लाटकर यांचे अल्पशा आजाराने दिनांक 04 जून, 2023 रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या 94 वर्षांच्या होत्या.

**गुफी पटेल**

ज्येष्ठ अभिनेते गुफी पटेल यांचे अल्पशा आजाराने दिनांक 05 जून, 2023 रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते 79 वर्षांचे होते.

**अशोक खराडे**

महाराष्ट्र शासन पुराभिलेख विभागाचे माजी संचालक अशोक खराडे यांचे अल्पशा आजाराने दिनांक 04 जून, 2023 रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते 75 वर्षांचे होते.

**विजय गावकर**

शिवसेनेचे परळचे पहिले शाखाप्रमुख व माजी नगरसेवक विजय गावकर यांचे वृध्दापकाळाने दिनांक 16 जून, 2023 रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते 79 वर्षांचे होते.

वरील सर्व मान्यवरांच्या दुःखद निधनाबद्दल शोक व्यक्त करून सर्व दिवंगताना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. तदनंतर नियमित कामकाजाला सुरुवात झाली.

**विकासात्मक वृत्तांत / काही उल्लेखनिय बाबी**

(२० मार्च २०२३ ते १८ जून २०२३)

- महाराष्ट्र राज्याचे माननीय राज्यपाल तथा कुलपती श्री. रमेश बैस यांनी दिनांक ०६ जून २०२३ रोजी मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरू पदी प्रा. रवींद्र कुलकर्णी यांची नियुक्ती केली. नवनियुक्त कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी दिनांक ०८ जून २०२३ रोजी मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरू पदाचा पदभार स्विकारला. विद्यापीठाचे मावळते प्रभारी कुलगुरू प्रा. दिगंबर शिर्के यांनी प्रा. रवींद्र कुलकर्णी यांच्याकडे कार्यभार सोपवला. याप्रसंगी मुंबई विद्यापीठाच्या दिक्षांत सभागृहात मावळते कुलगुरू प्रा. दिगंबर शिर्के यांचा निरोप समारंभ आणि नवनियुक्त कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांचा स्वागत कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

- दिनांक १७ जून २०२३ रोजी मुंबई विद्यापीठाच्या प्र.कुलगुरूपदी प्राचार्य डॉ. अजय भामरे यांची नियुक्ती करण्यात आली.

- २ ते ९ जून २०२३ या दरम्यान नेदरलँड येथे पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय मूट कोर्ट (अभिरूप न्यायालय) स्पर्धेसाठी मुंबई विद्यापीठातील पाच विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली युनिव्हर्सिटी ऑफ मुंबई लॉ एकेडमी (उमला) तील नाथन शिंदे, विष्णूप्रिया भोसले, आर्या गौतम आणि आरुषी केनिया या पाच विद्यार्थ्यांना प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या या आंतरराष्ट्रीय मूट कोर्ट स्पर्धेत सहभागी होता आले. या मूट कोर्ट स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना इंटरनॅशनल क्रिमीनल कोर्ट हेग, नेदरलँड येथे प्रतिनिधीत्वाची संधी मिळाली. लिडेन विद्यापीठ नेदरलँड यांच्या सहकार्याने इंटरनॅशनल क्रिमीनल कोर्टाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत ८० देशातील संस्था सहभागी झाल्या होत्या.

- मुंबई विद्यापीठाशी सलंग्नित महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त शिक्षणसंस्थामध्ये पदवीच्या प्रथम वर्षाला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मुंबई विद्यापीठातर्फे प्रवेशपूर्व ऑनलाईन नाव नोंदणीच्या प्रक्रीयेला दिनांक २७ मे २०२२ पासून सुरूवात करण्यात आली असून प्रवेशपूर्व ऑनलाईन नावनोंदणीस विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या प्रक्रीयेत १ लाख ८३ हजार १६२ एवढ्या विद्यार्थ्यांनी यशस्वी नोंदणी करून ६ लाख ५४ हजार ८२८ एवढे विविध अभ्यासक्रमांसाठी अर्ज सादर केले.

➢ मुबई विद्यापीठ आणि राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोग महाराष्ट्र शासन यांच्यात झालेल्या सामंजस्य करारान्वये १० प्राध्यापकांच्या संशोधन प्रकल्पांना मंजूरी मिळाली असून त्यांना संशोधन प्रकल्पासाठी नीधीचे वाटप करण्यात आले आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या सहाय्याने लोकांच्या सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी व समाजाभिमुख नाविन्यपूर्ण संशोधन करण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी दिनांक २५ मे, २०२२ रोजी सामंजस्य करार करण्यात आला होता. या करारान्वये मुंबई विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि पालघर जिल्ह्यातील संलग्नित महाविद्यालयीन शिक्षकांकडून या प्रकल्पाअंतर्गत विद्यार्थी विकास विभागामार्फत संशोधनासाठी प्रस्ताव मागविण्यात आले होते. या संशोधन प्रकल्पांना ४३ लाख ७४ हजार रुपयाचे अर्थसहाय्य करण्यात आले.

➢ पश्चिम विभागीय पातळीवरील १६ व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेमध्ये मुंबई विद्यापीठाने प्रथम पारितोषिक पटकावल्यानंतर, राष्ट्रीय पातळीवरील युवा संसद स्पर्धेचे आयोजन मुंबई विद्यापीठाच्या दीक्षान्त सभागृहात करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना संसदीय कार्यप्रणालीची ओळख व्हावी, त्यांच्यातील वक्तृत्व व नेतृत्वगुणांना वाव मिळावा यासाठी संसदीय कार्य मंत्रालय नवी दिल्ली यांच्यामार्फत दरवर्षी या स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. या स्पर्धेसाठी मुंबई विद्यापीठाशी संलग्नित विविध महाविद्यालयांतील ५५ विद्यार्थी सहभागी झाले होते. संसदीय कार्य मंत्रालयाच्या नियमानुसार परीक्षक म्हणून संसदीय कार्य विभागाचे उपसचिव अशोक आचार्य माजी संसद सदस्य ब्रतिन सेनगुप्ता आणि शिक्षणतज्ज्ञ डॉ. वैभव सूर्यवंशी यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

➢ महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिनाचे औचित्य साधून मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्ष पीजी युनिट आणि गो शून्य यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठातील सफाई कामगारांसाठी ई.श्रम कार्ड काढून देण्यासाठी विशेष मोहिम राबविण्यात आली. त्याच बरोबर सफाई कामगारांना स्वच्छतेचे प्राथमिक प्रशिक्षण देऊन कचरा व्यवस्थापनाबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. विद्यानगरी परिसरात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमासाठी मुंबई विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. प्रसाद कारंडे, राष्ट्रीय सेवा योजना कक्ष पीजी युनिटचे कार्यक्रम अधिकारी डॉ. विश्वंभर जाधव यांच्यासह शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी कलिना परिसर प्लास्टिकमुक्त करण्याचा संकल्पही करण्यात आला.

➢ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विविधांगी पैलू सर्वज्ञात आहेत. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात त्यांचे योगदान सर्वश्रूत आहेच मात्र एक स्ट्रेटेजिक थिंकर आणि फॉरेन पॉलिसी एक्सपर्ट म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे खूप मोठे योगदान भारताला लाभले आहे. त्यांच्या दूरदृष्टीतून आणि धोरणात्मक विचारातून आज भारताच्या सक्षम परराष्ट्र धोरणाची आखणी होत असल्याचे महत्वपूर्ण निरीक्षण राज्याचे उच्च शिक्षण संचालक प्रा. शैलेंद्र देवळाणकर यांनी नोंदविले. मुंबई विद्यापीठातर्फे महात्मा जोतीराव फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती सप्ताहाच्या समारोप कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारताचे परराष्ट्र धोरण, या विषयावर त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

➢ आंतरविद्यापीठीय राष्ट्रीय अन्वेषण संशोधन स्पर्धेत मुंबई विद्यापीठाने नेत्रदिपक कामगिरी करत सर्वसाधारण सुवर्ण पदक पटकावले असून या स्पर्धेत विद्यापीठास प्रथम क्रमांक मिळाला आहे. मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी दोन सुवर्ण आणि एक रौप्य पदकांची कमाई करत विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. भारतीय विद्यापीठ संघातर्फे (एआययु) १६ आणि १७ मार्च २०२३ रोजी गणपत विद्यापीठ, महेसाना, गुजरात येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

➢ राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला बळकटी देणारा आणि सक्षमीकरणाकडे वाटचाल करणारा मुंबई विद्यापीठाचा सर्वासमावेश विद्यार्थी केंद्रीत रुपये ८११ कोटीचा अर्थसंकल्प दिनांक २० मार्च २०२३ रोजी पार पडलेल्या अधिसभेत मंजूर करण्यात आला. यावर्षीच्या अर्थसंकल्पात विविध नाविण्यपूर्ण योजना आणि अनेक विकासकामांना प्राधान्यक्रम देण्यात आले आहे.

**बाब क्र.१**: शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ करिता पंचवार्षिक बृहत आराखड्या मध्ये नवीन महाविद्यालय निश्चित केलेले स्थानबिंदू विद्यापरिषदने दिलेल्या मान्यतेसह, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २९ (h) अन्वये अधिसभेसाठी मान्यतेसाठी सादर करण्याबाबत.

**ठराव** : असा ठराव मंजूर करण्यात आला की, दिनांक ७ जून २०२३ रोजीच्या विद्यापरिषदेने बाब क्रमांक २.२ अन्वेय शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ मधील पंचवार्षिक आराखडा नवीन महाविद्यालयाच्या स्थानबिंदू निश्चितीच्या प्रस्तावातील परिशिष्ट १ नुसार तसेच, चर्चेच्या दरम्यान अधिसभा सदस्यांनी सामाजिक, औद्योगिक व कौशल्याची निकड लक्षात घेता सुचवलेले स्थानबिंदू (उरण, पनवेल, मालाड-मालवणी, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, महाड, संगमेश्वर) समाविष्ट करण्यात आले व अधिसभेच्या मंजुरीसह शासनास सादर करण्याची शिफारस करण्यात आली.

**बाब क्र.२ :** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम २९ (जी) अन्वये विद्यापीठाचे २०२०-२०२१चे वार्षिक लेखे, ३१ मार्च २०२१ चे ताळेबंद अधिसभेसमोर मे. किशोर शेठ अँड कंपनी (सी.ए.) यांनी सादर केलेले मुंबई विद्यापीठाचे सन २०२०-२०२१ चे वार्षिक लेखे, ३१ मार्च २०२१ चे ताळेबंद व लेखा परीक्षण अहवाल वरील दिलेली स्पष्टिकरणे अधिसभेच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

**ठराव :** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम २९ (जी) अन्वये विद्यापीठाचे २०२०-२०२१चे वार्षिक लेखे, ३१ मार्च २०२१ चे ताळेबंद अधिसभेसमोर मे. किशोर शेठ अँड कंपनी (सी.ए.) यांनी सादर केलेले मुंबई विद्यापीठाचे सन २०२०-२०२१ चे वार्षिक लेखे, ३१ मार्च २०२१ चे ताळेबंद व लेखा परीक्षण अधिसभेच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला असता सदर बाब सर्व अधिसभा सदस्यांनी एकमताने मान्य केली.

सभेमध्ये सहभाग घेतल्याबद्दल सर्व उपस्थित सन्माननीय सदस्यांचे त्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार मानून सभा संपल्याचे अध्यक्षांच्या परवानगीने कुलसचिवांनी जाहीर केले.

सभेची सांगता राष्ट्रगीताने झाली.

कुलसचिव (प्र)

कुलगुरु